SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Phone : EPABX-2609000 **Stat Cell** : 0231-2609147.
Fax : 0091-231-2693294 **website : www.unishivaji.ac.in**
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
दूरध्वनी: (ईपीएबीएक्स)२६०९०० सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
फॅक्स : ००९१-२३१-२६९३२९४ **E-Mail : statcell@unishivaji.ac.in**
Estd : 1962
NAAC 'A' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/ एआयएसएचई/२०१७-२०१८/ 05 दिनांक : 11 JAN 2018

परिपत्रक

प्रति,
प्राचार्य / संचालक,
सर्व संलग्नीत महाविद्यालये / मान्यताप्राप्त संस्था

विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०१७-१८

डिसीएफ मध्ये माहिती भरणे व अपलोड करणेबाबत

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम २०१७-१८ वेबपोर्टलवर माहिती नोंद करण्याबाबत कळविलेले आहे. सदर वेबपोर्टलवर (www.aishe.gov.in) माहिती नोंद करण्याची सुरूवात दिनांक ०५/०१/२०१८ पासुन झालेली आहे. या अनुषंगाने विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांनी आपली प्रशासकीय, शैक्षणिक व शैक्षणिकेत्तर बाबींची सन २०१७-१८ करीता दिनांक ३० सप्टेंबर हया संदर्भ दिवसा पर्यतची माहिती तात्काळ वेबपोर्टलवर नोंदवावयाची आहे.

वेबपोर्टलवर माहिती नोंदविण्याबाबत खालील सुचना मा. प्राचार्य यांनी आपल्या महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांना देवुन त्याप्रमाणे कार्यवाही करून घ्यावी

१. महाविद्यालयाच्या एआयएसएचई नोडल अधिका-यांनी DCF II, IV व TIF फॉर्ममध्ये माहिती काळजीपुर्वक नोंद करावी. आपण नोंद केलेली माहिती नॅक मुल्याकंनासाठी उपयोग होणार आहे तसेच महा. डीबीटी पोर्टल, एआयसीटीई पोर्टलवर माहिती नोंद करताना एआयएसएचई वेबपोर्टलचा उपयोग होणार असल्याने आपण माहिती अचूक व काळजीपुर्वक नोंद करावी. एआयएसएचई वेबपोर्टलवर नोंद केलेल्या माहितीची सर्वस्वी जबाबदारी संबंधीत महाविद्यालयाची राहिल याची आपण कृपया नोंद घ्यावी.

२. महाविद्यालयांनी वेबपोर्टलवर सन २०१७-१८ ची माहिती व्यवस्थितरित्या नोंदल्याचें तसेच ती पडताळुन बरोबर असल्याचे प्रमाणपत्र प्राचार्य यांच्या स्वाक्षरीचे हार्ड कॉपी विद्यापीठाकडे पाठवावी व सॉफ्ट कॉपी मा. शिक्षण संचालक कार्यालय, पुणे यांच्या stat.dhepune@nic.in या ई-मेल आयडीवरती पाठविण्यात यावी. (**सोबत प्रमाणपत्राचा नमुना जोडलेला आहे.**)

३. उपरोक्त प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर विद्यापीठाकडुन आपणास ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे तद्नंतर आपली विद्यापीठातील प्रशासकीय कामकाज पुर्ण होणार आहे. यांची कृपया आपण नोंद घ्यावी.

४. वेबपोर्टलवर माहिती नोंद करून DCF II, IV व TIF फॉर्म अपलोड केल्यानंतरच Remuneration Mangement मध्ये आपले बॅकेचे नाव, बॅक खाते क्रमांक, पॅन क्रमांक ,IFSC कोड अद्ययावत करावा. आपण जर सदरची माहिती अद्ययावत केली नाही तर आपल्यास सदरचे फॉर्म भरल्याबाबतचे मानधन मिळणार नाही यांची कृपया आपण नोंद घ्यावी.

५. AISHE व MIS वेबपोर्टलवर आपल्या महाविद्यालयांचे नोडल अधिकारी तसेच महाविद्यालयांचे संपर्क क्रमांक व ई-मेल आयडी तपासावे तसेच विद्यापीठाने महाविद्यालयांना दिलेले ई-मेल आयडी वेबपोर्टलवर नोंद करावे. जेणेकरून पत्र व्यवहार करणे सोईसकर होईल.

६. वेबपोर्टलवर माहिती भरण्याबाबतची कार्यशाळा जिल्हानिहाय माहे जानेवारी २०१८ मध्ये आयोजित करण्याचे नियोजित आहे. महाविद्यालयांच्या MIS आणि AISHE नोडल अधिकारी यांनी सदर कार्यशाळेसाठी उपस्थित राहणे बंधनकारक आहे. कार्यशाळेच्या दिनांकाबाबत स्वतंत्ररित्या आपणास कळविण्यात येईल.

७. महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी आपल्या महाविद्यालयांची AISHE अनुषंगाने माहिती वेबपोर्टलवर लवकरात लवकर नोंदवुन विद्यापीठास सहकार्य करावयाचे आहे. माहिती तात्काळ नोंद केल्यास आपल्यास देय असलेले मानधन वेळेत मिळण्यास सोईचे होईल.

८. **वेबपोर्टलवर माहिती नोंद करत असता काही अडचण निर्माण झाल्यास महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी सांख्यिकी कक्ष,(खोली क्रमांक ३१३) शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर . दूरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.**

कळावे.

आपला विश्वासू,

कुलसचिव.

सोबत : वरीलप्रमाणे

(महाविद्यालयाने द्यावयाचे प्रमाणपत्र)

-: प्रमाणपत्र :-

प्रमाणित करण्यात येते की, प्रमाणित करण्यात येते की, अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम (एआयएसएचई) सन २०१७-१८ या वेबपोर्टलवर .....

.....हया महाविद्यालयाची शैक्षणिक व शैक्षणिकेत्तर बाबींची सर्व माहिती अपलोड केली आहे. सदरील माहितीची पडताळणी करण्यात आली असून ती बरोबर व वैध असल्याचे आढळून आले आहे. त्याची सर्वस्वी जबाबदारी माझी आहे.

दिनांक : / /२०१ स्वाक्षरी :

ठिकाण : प्राचार्याचे नाव :

संस्थेचे नाव :

शिक्का :